कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी नेमलेली अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांक: - अस्थामु-२०१९/प्र.क्र.४०/१-स

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

दि. १५ एप्रिल, २०१९.

वाचा:-

१. शासन निर्णय क्रमांक: -राजस १००८/प्र.क्र.५३८/५-स, दि.०५.०५.२०११.
२. शासन निर्णय क्रमांक: -मुदवा-२२१८/प्र.क्र.८८/९-स, दि.०५.०४.२०१८.
३. शासन निर्णय क्रमांक: -अस्थाप-२०१८/प्र.क्र.१५५/१-स, दि.२९.१०.२०१८.
४. वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९.
५. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.आस्थापना/कक्ष-१/कृषि प्रक्रिया संस्था/१०६१/मुदतवाढ/२५६, दि.२८.०२.२०१९ व क्र.५८५, दि.०३.०४.२०१९.

प्रस्तावना:-

कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी नेमलेली सतत व समवर्ती योजनेंतर्गत मंजूर असलेली अस्थायी पदे सन २०१८-१९ करिता पुढे चालू ठेवण्याबाबत (Continuation Of Temporary Posts) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाने वरील **संदर्भ ४** येथील पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावातील ३२ अस्थायी पदे दि.०१.१०.२०१८ ते दि.२८.०२.२०१९ या कालावधीत पुढे चालू ठेवण्यासाठी **वाचा क्र. ३** येथील, दिनांक २९.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. **संदर्भ-१** येथील शासन निर्णयान्वये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील स्थायी/अस्थायी पदांच्या आढाव्यानुसार एकूण ९,३१९ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर आकृतीबंधातील पदांच्या तालुका/जिल्हा/विभाग/मुख्यालय स्तरावरील कार्यालयनिहाय वाटपाचे तपशिलवार आदेश निर्गमित करण्याच्या सूचना सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना देण्यात आलेल्या होत्या. कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांसाठी मंजूर ३२ पदांच्या तालुका/जिल्हा/विभाग/मुख्यालय स्तरावरील कार्यालयनिहाय वाटपाचे अवलोकन केले असता, ज्या ठिकाणी कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य वितरित करण्यात आलेले आहे, त्या जिल्ह्यात सदर पदांचे वाटप झालेले नाही, असे दिसून येते. आतापर्यंत कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना वितरित करण्यात आलेल्या अर्थसहाय्याच्या वसुलीचा आढावा

घेण्यात आला असता, अत्यल्प प्रमाणात वसुली झाल्याचे दिसून येते. कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी निर्माण केलेल्या सदर पदांद्वारे कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांचे कामकाज करुन घेण्यात येत नाही, असे दिसून येते. कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार अर्थसहाय्याचे वाटप करताना प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आले असता, ज्या संस्थांना यापूर्वी अर्थसहाय्य दिले आहे व ज्या बंद किंवा अवसायनात गेल्या आहेत त्या संस्थांकडून अर्थसहाय्याची रक्कम वसूल करावी. तसेच, सदर वसुलीसाठी काय यंत्रणा आहे याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना वित्त व नियोजन विभागाने दिलेल्या आहेत. तसेच, यापूर्वी देण्यात आलेल्या संस्थांकडून कर्जाची वसुलीही होत नाही. मात्र, शासन या कर्जावरील व्याज प्रत्येक वर्षी नियमितपणे अदा करित आहे. त्यामुळे, सदर कर्जाचा शासनावर अतिरिक्त आर्थिक बोजा पडतो. ही बाब विचारात घेता तसेच क्षेत्रीय कार्यालयातील स्थायी/अस्थायी पदांच्या मंजूर आकृतीबंधानुसार कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी निर्माण केलेल्या पदांचे योग्य प्रकारे वाटप झालेले नसल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे, कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची वसुली व शासनास सादर होणारे प्रस्ताव योग्य प्रकारे तपासणी करण्यासाठी सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आल्यानुसार सदर पदांची पुर्नरचना करणे आवश्यक वाटते. त्यामुळे, सोबतच्या विवरणपत्रात दर्शविण्यात आल्यानुसार पुर्नरचनेबाबतचे आदेश सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा. पुणे यांनी निर्गमित करावेत, अशा सूचना देण्यात येत आहेत. कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी निर्माण करण्यात आलेल्या ३२ पदांना दि.०१.०३.२०१९ पासून मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

शासन याबाबतीत आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे : -

सहकारी संस्थांचे सतत व समवर्ती लेखापरिक्षण करण्यासाठी खालील तक्त्यांत दर्शविण्यात आलेल्या **कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या सांविधानिक लेखापरिक्षणासाठी कर्मचारी वर्ग** या योजनेवरील एकूण ३२ अस्थायी पदांना **संदर्भ क्र.३** अन्वये दि.२८.०२.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देण्यात आलेली होती. वित्त विभाग, शासन निर्णय दि.२१.०२.२०१९ नुसार आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या सर्व अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना दिले आहेत. त्यामुळे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी **संदर्भ क्रमांक ४** मधील पत्रान्वये शिफारस केलेल्या तथापि, खालील तक्त्यात दर्शविण्यात आल्याप्रमाणेच ३२ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील सूचनेप्रमाणे सदर मंजूर आकृतीबंधातील पदांच्या तालुका/जिल्हा/विभाग/मुख्यालय स्तरावरील कार्यालयनिहाय वाटपाचे तपशिलवार आदेश सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित करावेत व याबाबतची खातरजमा पणन संचालक, पुणे यांनी करुन घ्यावी.

योजनेचे नाव : - कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांचे वैधानिक लेखापरिक्षण व इतर आवश्यक कामासाठी कर्मचारी वर्ग.

मुख्यालय जिल्ह्याचे नाव व त्या अंतर्गत जिल्हे	पदाचे नाव						
	विशेष लेखापरिक्षक वर्ग-२	लेखापरिक्षक श्रेणी-१	लेखापरिक्षक श्रेणी-२	उपलेखा-परिक्षक	लिपिक	शिपाई	एकूण
कोल्हापूर - कोल्हापूर	१	०	१	१	२	१	६
सांगली - सांगली	१	०	०	१	२	१	५
सिंधुदुर्ग - सिंधुदुर्ग	१	०	०	१	१	१	४
रत्नागिरी - रत्नागिरी	१	०	०	१	१	१	४
बीड - अहमदनगर, उस्मानाबाद, औरंगाबाद, धुळे, बीड	०	१	०	०	२	१	४
नागपूर - वर्धा, अमरावती, नागपूर	०	१	०	०	२	१	४
वाशिम - हिंगोली, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, वाशिम	०	१	०	०	१	०	२
लातूर- परभणी, नांदेड, पुणे, सोलापूर, लातूर	०	०	१	०	१	१	३
एकूण	४	३	२	४	१२	७	३२

वरील कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांच्या सांविधानिक लेखापरिक्षणासाठी कर्मचारी वर्ग या योजनेवरील एकूण ३२ अस्थायी पदांवर होणारा खर्च खालील लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० करिता मंजूर करण्यात आलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक : - व्ही-२
मुख्य लेखाशीर्ष : - २४२५, सहकार
उपलेखाशीर्ष : - १०१, सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण
गौणशीर्ष : - (००) (०१) लेखापरिक्षणासाठी कर्मचारी वर्ग - (२४२५ ०२२७)

६. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेतन व भत्त्याच्या रक्कमेत चालू वर्षाच्या खर्चात (२०१९-२०२०) १.५% बचत होईल असे पहावे. सदर पदे सहा महिन्यांपेक्षा अधिक

कालावधीसाठी रिक्त असल्यास अशी पदे वगळण्यात यावीत. तसेच लेखापरिक्षण शुल्काची वसुली पूर्णत: होईल, अशी दक्षता घ्यावी आणि लेखापरिक्षण शुल्क वसुलीच्या मर्यादेतच आस्थापना खर्च करावा.

७. सदरचे आदेश शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क.,दि.२१.०२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४१६१३१०३६८५०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Jaiprakash Mansaramji Ambade

Digitally signed by Jaiprakash Mansaramji Ambade
DN: CN = Jaiprakash Mansaramji Ambade, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Cooperative Marketing
Date: 2019.04.16 13:25:07 +05'30'

ज.म. अंबादे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

०१.मा. राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव
०२.मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
०३.मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
०४. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
०५. सर्व मा. विधीमंडळ सदस्य,
०६. महालेखापाल-१ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
०७. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
०८. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
०९. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१३. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरिक्षण)
१६. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१८. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-२/वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१९. कक्ष अधिकारी, सर्व कार्यासने, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२०. निवडनस्ती (१-स).

****